# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचेकार्यालय**

रामनगरसृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे

**दुरध्वनीक्र. ०२२-२९४५१००१**

E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्रमांक :- १३२/२०२५ दिनांक :- २०/०३/२०२५.

**मागील १७ वर्षोपुर्वी सन २००८ साली वसई पुर्वेस स्वतःच्या जीवलग मित्राचा आणि सन २००२ साली पश्चिम बंगाल राज्यस्थित हल्दीया जिल्हातील स्वतःच्या सावत्र आईचा आणि ३ अल्पवयीन सावत्र भावंडाचा निघृन खुन करणा-या आरोपीतास कर्नाटक राज्यातील बंगलुरु येथुन जेरबंद करण्यास गुन्हे शाखा, कक्ष -२ वसई यांना यश.**

**अपराध हकिगतः-**

दिनांक २७.३.२००८ रोजी आरोपीत राजु उर्फ अक्षय विजय शुक्ला याने मयत मनोज राजबिहारी साह वय-२५ वर्ष रा. ठि. वालीव, वसई पुर्व याचे समवेत एकमेकांच्या राहत्या घरचे असलेल्या सामाईक भिंतीचे वादाचा मनात राग मनात धरुन दिनांक २६.३.२००८ रोजी २०:०० वाजता ते दिनांक २७.३.२०२८ रोजी ०९:०० वा.च्या सुमारास कल्पतरु इंन्डस्ट्रीयल इस्टेट, चिंचपाडा, वालीव येथील मे. युटिलीटी प्रिंटर्स या कंपनीचे पोटमाळयावर मयत मनोज साह याचे डोके भिंतीवर आपटुन लेससारख्या दोरीने गळा आवळून खुन केला होता. सदरबाबत माणिकपुर पो.ठाण्यात गु.नों.क्र.१११/२००८ भादविसं क ३०२ अन्वये अपराध दाखल करण्यात आला होता.

**अपराध प्रकरणाची उकल :-**

गुन्हे शाखा, कक्ष - २ चे पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी सातत्यपुर्ण अन्वेषण दरम्यान आरोपीत राजु उर्फ अक्षय विजय शुक्ला यास महादेवपुरा पोलीस ठाणे, राज्य कर्नाटक येथुन ताब्यात घेण्यास गुन्हे शाखा कक्ष ०२ चे पथकास यश आले.

आरोपीतास पोलीस पथकाने ताब्यात घेतल्यानंतर त्यांचेकडे केलेली चौकशीत त्याचे पुर्वीचे नाव निरंजनकुमार असल्याचे समजले. तसेच तो सन २००२ मध्ये त्यांचे वडील आणि सावत्र आई, अल्पवयीन दोन सावत्र बहीणी आणि सावत्र भाऊ यांचेसह हल्दीया, जिल्हा- पुर्व मिदनापुर, पश्चिम बंगाल येथे राहत असल्याची माहिती समोर आली. तथापि, आरोपीत राजु उर्फ अक्षय विजय शुक्ला याचेशी त्याची सावत्र आई चांगले वागत नसे, त्याला जाच करीत असे. यातुन उदभवलेल्या कौटुंबीक वादातुन आरोपीताने दिनांक २६.२.२००२ रोजी त्यांचे राहते घरात १) सावत्र आई गिताकुमारी शुक्ला तसेच २) सावत्र बहीणी कु. पुजाकुमारी वय : ७ वर्षे व ३) कु. प्रियंकाकुमारी वय : ६ वर्षे ४) सावत्र भाऊ मान वय : २ वर्षे यांचा खुन केल्याची माहीती प्रकाशात आली आहे.

आरोपीत राजु उर्फ अक्षय विजय शुक्लाने दिलेल्या माहितीनुसार हलदिया पोलीस ठाणे, राज्य पश्चिम बंगाल यांना संपर्क साधुन माहीती घेतली. त्यावेळी आरोपीत निरंजन उर्फ रंजन उर्फ राजु उर्फ अक्षय विजय शुक्लाने त्याचे सावत्र आई व भावंडाचा बोथट हत्याराने मारहाण करुन व गळा आवळुन केलेल्या खुनाच्या घटनेबाबत यांचे वडील विजयकुमार शुक्ला ( सध्या मयत ) यांनी दिलेल्या तक्रारीवरुन हलदिया पो.ठाण्यात गु.नों.क्र.१३/२००२ भादविसं कलम ३०७,३२६,३०२ अन्वये गुन्हा नोंद असल्याचे माहीती मिळाली. नमुद गुन्हा केल्यानंतर आरोपीत हा नवी मुंबई, ठाणे व वसई परीसरात स्वतःचे आस्तीत्व व खरी ओळख लपवुन वास्तव्य करुन पोलीसांना गुंगारा देत होता. त्यादरम्यान आरोपीत निरंजन उर्फ रंजन उर्फ राजु उर्फ अक्षय विजय शुक्ला याने माणिकपुर पोलीस ठाणे गुन्हा रजि नं I १११/२००८ आय.पी.सी.कलम ३०२ प्रमाणे दाखल असलेला गुन्हा करुन पळुन गेला होता.

**अटक करण्यात आलेल्या आरोपीताचे नावः-**

निरंजनकुमार उर्फ रंजन उर्फ राजु उर्फ अक्षय विजय शुक्ला वय ४० वर्ष, सध्या रा. रु. नं. १६, हनी बिल्डींग, बी ५, नारायणपुरा, २ क्रॉस कामधुेननगर, महादेवपुरा, बेंगळुरु, राज्य-कर्नाटक, पिन नंबर ५६००१६,

**आरोपीताकडुन उघडकीस आलेले गुन्हेः-**

| अं. नं. | पोलीस ठाणे | गुन्हा रजी नंबर | कलम |
|---|---|---|---|
| १ | माणीकपुर पो स्टे. | १११/२००८ | भादविस कलम ३०२ प्रमाणे |
| २ | हलदीया पो.स्टे, जिल्हा- पुर्व मेडीनीपुर, राज्य पश्चिम बंगाल | १३/२००२ | भादविस कलम ३२६,३०७,३०२ प्रमाणे. |

सदरची कामगिरी श्री मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त सो., श्री. दत्तात्रय शिंदे, अपर पोलीस आयुक्त सो, श्री अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ सहा. पोलीस आयुक्त सो, (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली, गुन्हे शाखा कक्ष २ वसई युनीटचे श्री. समीर आहीरराव पोलीस निरीक्षक, सपोनिरी/सोपान पाटील, सागर शिंदे, पोउपनिरी/अजित गिते, सहाफौज/रमेश भोसले, सहाफौज/संजय नवले, पोहवा/रविंद्र पवार, मुकेश पवार, प्रफुल्ल पाटील, चंदन मोरे, सचिन पाटील, राजाराम काळे, जगदीश गोवारी, दादा आडके, सुधीर नरळे, प्रशांतकुमार ठाकुर, पो.अं./अकिल सुतार, राहूल कर्पे, अनिल साबळे, अजित मैड, प्रतिक गोडगे, राजकुमार गायकवाड, मसुब/रामेश्वर केकान, अविनाश चौधरी सर्व नेम. गुन्हे शाखा कक्ष - ०२ वसई, तसेच सहाफौज/संतोष चव्हाण नेम- सायबर शाखा मि.भा.व.वि पोलीस आयुक्तालय यांनी उत्कृष्टरीत्या पार पाडली आहे.

